भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन
पुणे

- प्रेसनोट - दि.१८/०८/२०१९

## दहशत निर्माण करण्यासाठी धारधार शस्त्रास्त्र व बनावट पीस्टल बाळगण्या-या सराईत गुंडास अटक

---

दि.१७/०८/२०१९ रोजी सहा. पोलीस आयुक्त मालोजीराव पाटील, स्वारगेट विभाग यांच्या दिमतीत भारती विद्यापीठ तपास पथकातील पोलिस उप निरीक्षक सुबराव लाड व पो ना सर्फराज देशमुख, व सहा.पो.आयुक्त कार्यालयाकडील पो.हवा. डी.सी.बारभाई, पो हवा. एस.एम.रसाळे, पो हवा एस.पी.पगारे, पो हवा आर.जी.बारबोले, पो.ना. एस.ए.बारटक्के, पो.शि. ए.ए.गोफने, पो.शि. एस.एस.दिवटे यांचेसह सरकारी वाहनातुन व खाजगी मोटार सायकल वरुन भारती विदयापीठ पोलीस ठाणे हददीत आगामी दही हंडी व गणपती उत्सवाच्या अनुषंगाने सुरक्षिततेच्या दृष्टीने लॉज चेकीग करत पुणे ते सातारा हायवे रोडने गंधर्व लॉन्स समोरुन जात असताना सच्चाईमाता - अंजलीनगर कडुन येणाऱ्या रोडवरुन पॅशन मोटार सायकलवर काळे रंगाचा टि शर्ट, व लाल रंगाचे जर्किग घातलेले इसमांचा **पोलिस नाईक सर्फराज देशमुख** यांना संशय आलेने त्यांचा पाठलाग करुन त्यांना पकडले. त्यांना त्याचे नाव पत्ता विचारता त्यांनी त्याची नावे व पत्ते १) आदित्य विनोद नाईक, वय १९ वर्षे, रा. हनुमाननगर, दुर्गा माता मंदिराच्या जवळ, जाभुळवाडी रोड, आबेगाव खुा पुणे २) सागर हनुमंत अहिवळे, वय २० वर्षे, रा. जांभुळवाडी रोड, शनिमंदिर जवळ, आबेगाव खुा पुणे असे सांगितले. त्यावेळी त्याच्याकडे काही तरी संशयीत वस्तु असल्याचा संशय आल्याने त्यांची वरील स्टाफ च्या मदतीने त्या इसमाची अंगझडती घेतली असता आदित्य विनोद नाईक यांच्या अंगझडतीत कमरेला खोचलेला एक लोखंडी कोयता व एक बनावट पिस्टल मिळुन आले. तसेच सागर हनुमंत अहिवळे यांच्या अंगझडतीत कमरेला खोचलेला एक धारदार लोखंडी कोयता मिळुन आला. त्यांच्याकडे मिळुन आलेल्या हत्त्यारांबाबत सखोल चौकशी करता त्यांनी त्यांचा विरोधक अमित शिर्के याचे बरोबर पुर्वी झालेल्या भांडणाचा राग मनात धरुन दही हंडी किंवा गणेश उत्सवा दरम्यान संधी मिळेल त्यावेळेस त्याला मारण्याच्या उद्देशाने स्वतः जवळ बाळगल्याचे सांगीतले

**सदरची कारवाई मा.श्री श्रीकांत तरवडे सो अप्पर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग, मा.श्री सरदेशपांडे सो पोलीस उप-आयुक्त परि-२ पुणे शहर, मा. मालोजीराव पाटील सहा.पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग पुणे, यांच्या दिमतीत विष्णू ताम्हाणे पोलीस निरीक्षक (गुन्हे) व तपास पथकाचे अधिकारी पो.उप-निरीक्षक श्री. सुबराव लाड व भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन तपास पथकातील कर्मचारी व सहा.पो.आयुक्त कार्यालयाकडील कर्मचारी यांनी मिळुन संयुक्त कारवाई केलेली आहे.**

वरिष्ठ पोलीस निरीक्षक
भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन